# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेड
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## संक्षिप्त टिप्पणी



# ☼ संक्षिप्त टिपणी ☼

**आरोग्य सुविधाः**

महाराष्ट्र राज्याच्या पूर्व सिमेला नांदेड जिल्हा दक्षिणोत्तर पसरलेला असून जिल्हयाच्या पूर्वेस आंध्रप्रदेश व पुर्वदक्षिणोत्तर भागास कर्नाटक राज्य पसरलेला आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १०,५०२ चौ.कि.मी. आहे. जिल्हयात (१६) तालुके असून त्यात किनवट व माहूर या आदिवासी क्षेत्र तालुक्यांचा समावेश आहे.

**आरोग्य संस्थाः**

| | | |
|---|---|---|
| ✓ प्राथमिक आरोग्य केंद्रे | : | ६९ |
| ✓ नागरी दवाखाने | : | ०७ |
| ✓ आयुर्वेद दवाखाने | : | ०७ |
| ✓ युनानी दवाखाने | : | ०६ |
| ✓ प्राथमिक आरोग्य पथके | : | ११ |
| ✓ फिरते आरोग्य पथक | : | ०५ |
| ✓ उपकेंद्रे | : | ३७७ |
| ✓ ग्रामीण रुग्णालये | : | १२ |
| ✓ उपजिल्हा रुग्णालये | : | ०६ |
| ✓ जिल्हा रुग्णालय | : | ०१ |
| ✓ स्त्री रुग्णालय | : | ०१ |
| ✓ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय | : | ०१ |
| ✓ शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय | : | ०१ |

वरील संस्थेपैकी आदिवासी किनवट व माहूर क्षेत्रात ग्रामीण रुग्णालये ०३, प्राथमिक आरोग्य केंद्रे १४, उपकेंद्रे ९२, प्राथमिक आरोग्य पथके ०७, फिरते आरोग्य पथके ०५, अशा संस्था कार्यन्वित आहेत. ज्यामधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी आंच्यामार्फत आरोग्य सेवा देण्याचे मोलाचे कार्य पार पाडण्यात येत आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि.नांदेड

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य कार्यक्रमांची वाटचाल

देशाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीमध्ये आरोग्यास अनन्यसाधारण महत्व आहे. हा मुददा घेऊन एप्रिल २००५ पासुन संपुर्ण देशात राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान कार्यान्वित आहे. यामध्ये प्राथमिक आरोग्यसेवेत काही मुलभुत बदल करुन मुलभुत आरोग्य सुविधामध्ये सुधारणा करण्या बरोबरच परिसर स्वच्छता पोषण व सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा या बाबीकडे सुध्दा लक्ष दिले जात आहे. कारण या बाबीचा आरोग्याशी थेट संबंध आहे.

### अभियानाचा उददेश / ध्येय

- माता व बाल मृत्यु दर कमी करणे.
- अन्न व पोषण, स्वच्छ व आरोग्यदायी बनविण्यासाठी सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देणे आणि माता व बाल आरोग्य तसेच लसीकरण हे ध्येय समोर ठेवुन सार्वजनिक आरोग्य सेवा पुरविणे.
- एकात्मिक प्राथमिक आरोग्य सुविधांचा वापर वाढविणे.
- लोकसंख्या स्थिरता व लिंग आणि लोकसंख्येचे प्रमाण राखणे.

# अभियाना अंतर्गत योजना/ कार्यक्रम

## जननी सुरक्षा योजना

जननी सुरक्षा योजने करीता पात्र लाभार्थी ठरविताना बीपीएल, एस.सी. आणि एस.टी कुटुंबातील लाभार्थीचे वय प्रसूतीची नोंदणी करतेवेळी १९ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे प्रसूतीची नोंदणी करतेवेळीस लाभार्थीस ० किंवा १ अपत्य असणे आवश्यक होते. परंतु २०१३-१४ मधील नविन नियमाप्रमाणे बीपीएल, एस.सी. आणि एस.टी कुटुंबातील गरोदर माता तिचे वय कितीही असले तरी आणि त्यामातेस कितीही अपत्य असलेतरीही त्या गरोदर मातेस जेएसवाय लाभार्थी समजून प्रा. आ.केंद्र, उपकेंद्र, ग्रा.रु./ उप.जि.रु. व मानांकिंत आरोग्य संस्थेत प्रसूती झाल्यास रु. ७०० ,शहरी भागाकरिता रु ६०० व गर्भवती मातेस प्रसुती दरम्यान मानांकित आरोग्य संस्थेत सिझेरियन झाल्यास रु १५०० अनुदान देण्यात येते.

परंतू घरी प्रसूती झाल्यास फक्त बीपीएल कुटुंबातील लाभार्थीस रुपये ५००/- याप्रमाणे लाभ देण्यात येतो.एस.सी व एस.टी. या कुटुंबातील गरोदर मातेची प्रसूती घरी झाल्यास आणि ते कुटुंब बीपीएल मध्ये वर्ग होत नसल्यास अशा लाभार्थीस जेएसवाय चा लाभ देण्यात येत नाही.

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास पुरुषांसाठी रु १४५१/- , स्त्री नसबंदी (फक्त एस.सी, एस.टी, बी.पी.एल. लाभार्थी ) करिता रु ६५०/-, स्त्री नसबंदी (बी.पी. एल. वरील लाभार्थी) करिता २५०/- शासकीय आरोग्य संस्थेत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर लाभ देण्यात येतो.

## जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (टोल फ्री क्र. १०२)

माता व बाल मृत्यु दर कमी करण्यासाठी माता व बालकांना वेळीच उपचार मिळणे ही महत्वाची बाब आहे. यास अनुसरुनच केंद्र सरकारने जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहेः

- गरोदर मातांना नोंदणी, तपासणी, औषधोपचार, बाळांतपणे, या सर्व सेवा मोफत पुरविणे. यामध्ये प्रयोगशाळा तपासण्या, सिझेरियन सेक्शन, रक्त संक्रमण या बाबींचाही समावेश आहे.
- नवजात अर्भकांना ० ते १ वर्षा पर्यंत उपचारासाठी दाखल झाल्यास नोंदणी, तपासणी व औषधांपचार या सेवा मोफत पुरविणे.

- गरोदर मातांना बाळांतपणाच्यावेळी व अर्भकांना घरातुन रुग्णालय,रुग्णालय ते रुग्णालय (संदर्भसेवेसाठी) आणि रुग्णालय ते घर अशी वाहतुक सेवा मोफत पुरविणे.

## संस्थात्मक प्रसुती :

जिल्हयामध्ये आरोग्य संस्थेचे कायापालट, आरोग्य संस्थेमध्ये देण्यात येणा-या सुविधा पाहुन संस्थात्मक प्रसुती करण्याचा दृष्टीकोन जनतेमध्ये निर्माण झालेला असुन जिल्ह्यात मागील ७ वर्षाचा संस्थात्मक प्रसुतीचा आलेख पाहील्यास तो ९९ टक्क्यांच्या वर गेला आहे.

## आशा कार्यक्रम

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत विशेषतः ग्रामीण जनतेला आरोगय सेवा यशस्वीश्रित्या आणि सातत्याने मिळाव्या हा दृष्टीकोन समोर ठेवून सर्वासाठी आरोग्याच्या आशा पुन्हा प्रकाशित झाल्या. ग्रामीण पातळीवर अभियानाचा एक भाग म्हणून प्रत्येक गावामध्ये स्त्री आरोग्य स्वयंसेविका आशा ची निवड करण्यात आली आहे. ही मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ती आहे.

- बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये १००० लोकसंख्येमागे १ आशा कार्यकर्ती व आदिवासी क्षेत्रामध्ये लोकसंख्येची अट नसुन प्रत्येक गावामध्ये १ आशा कार्यकर्तीची निवड करण्यात येते.
- आशा ही सरकारी कर्मचारी अथवा मानधनी कर्मचारी नसून तिला केलेल्या कामानुसार मोबदला किंवा आर्थिक फायदा देण्यात येतो.
- जिल्हयामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये २७० आशा व बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये १४६० से एकुण १७३० आशा कार्यकर्ती कार्यरत आहेत.

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

शैक्षणीक जीवनामध्ये विद्यार्थ्यांना आरोग्य,आरोग्याबाबत घ्यावयाची काळजी या गोष्टींची जाणीव करुन दिल्यास भावी आयुष्यामध्ये विद्यार्थी स्वतःच्या आरोग्य संवर्धनामध्ये महत्वाची भुमिका पार पाडु शकतात.

त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य संवर्धन करणे, आरोग्य जाणीव-जागृती करणे, आरोग्य दोष शोधुन त्यावर उपचार करणे व त्यासाठी आवश्यक पुरवठा करणे यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत ० ते १८ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी पथक कार्यान्वित असुन सदर पथकामध्ये एक स्त्री वैद्यकीय अधिकारी, एक पुरुष वैद्यकीय अधिकारी, एक औषध निर्माता व एक ए.एन.एम. कार्यरत आहेत.

## सिकल सेल कार्यक्रम

सिकलसेल आजार हा गंभीर स्वरुपाचा असुन यामध्ये लाल रक्तपेशी आपल्या गोल आकार बदलुन कोयत्याच्या आकाराच्या होतात. साधारण रक्तपेशी हया गोल आकाराच्या असतात आणि त्या रक्तवाहिन्यामधुन शरीराच्या सर्व भागांपर्यंत सहज ऑक्सीजन वाहुन नेतात. सिकलसेल असलेल्या रक्तपेशी रक्तवाहिन्यामधुन सहज वाहुन जाऊ शकत नाही. त्या घटट आणि चिकट होतात. त्यांचा पुंजका होतो आणि रक्तवाहिन्यामध्ये अडकुन त्यांच्या गाठी होतात व रक्तपुरवठयामध्ये अडथळा निर्माण होतो.

या आजारामध्ये आई आणि वडील दोघेही सिकलसेल ग्रस्त किंवा वाहक असल्यास त्यांचा अपत्यांना हा आजार होऊ शकतो. त्यामुळे समाजातील सिकलसेल वाहक / ग्रस्त व्यक्ती शोधून काढणे व त्यांनी आपआपसात विवाह टाळावा यासाठी समुपदेशन करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्‌दिष्टे आहे.

## टेलिमेडिसीन सेंटर

रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा देण्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नये या करिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत टेलिमेडिसीन सेंटर हे जि.रु. नांदेड, उप जि.रु. हदगाव व किनवट येथे कार्यान्वित असुन या सेंटर व्दारे अतिगंभीर आजार रुग्णांना टेलिमेडिसीन सेंटर व्दारे

**१) शा.वै.म.औरंगाबाद २) के.ई.एम.मुंबई ३) बी.जे.वै.म. पुणे ४) शा.वै.म. नागपुर**
**५) नानावटी रुग्णालय मुंबई ६) सर जे.जे.रुग्णालय मुंबई**

या रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे कडुन दृकश्राव्य माध्यमातुन मार्गदर्शन घेण्यात येते व आवश्यकता भासल्यास पुढील संदर्भ सेवा देण्याकरिता संदर्भीत करण्यात येते.

## पायाभुत सुविधा विकास कक्ष

या कक्षमार्फत आरोग्य संस्थेच्या इमारतीची तात्काळ दुरुस्ती करुन चांगल्या आरोग्य सेवा पुरविण्याकरिता व दर्जा उंचाविण्यात येत असुन संस्थात्मक प्रसुतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसुन येत आहे. या कक्षा मध्ये जिल्हास्तरावर एक उप अभियंता , एक कार्यक्रम सहाय्यक कार्यरत असुन प्रत्येक चार तालुक्यासाठी एक कनिष्ठ अभियंताची नेमणुक करण्यात आली आहे.

## मनुष्यबळ

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हयात एकूण १२८५ पदे मंजुर असुन आज रोजीपर्यंत ११३२ पदे कार्यरत आहेत.